# महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई

**( महाराष्ट्र शासनाचा उपक्रम )**

**मुख्य कार्यालय पत्ता** : ३ रा मजला, एन्.के.एम्.इन्टर नॅशनल हाऊस, बाबुभाई एम्.चिनाय मार्ग,
एल.आय.सी. (योगक्षेम) इमारतीच्या मागे, चर्चगेट, मुंबई -४०० ०२१.
टेलीफॅक्स ०२२-२२०२६०१४,२२०२५०२२. इमेल : mfdc@rediffmail.com
**बर्फ कारखान्याचा पत्ता : महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ, कुडाळ बर्फ कारखाना, प्लॉट नं. -४४, एम. आय. डी. सी. कुडाळ, जि. सिंधुदूर्ग**

## महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ, कुडाळ, जि. सिंधुदूर्ग येथील ३० टन प्रति दिवस क्षमतेचा बर्फ कारखाना १० टनी शितगृहासह आहे त्या स्थितीत ठेक्याने चालविणेबाबत

**निविदा फॉर्म क्रमांक : ममविम/ब.का.कुडाळ/ठेका/२०१८-१९/..............**
**कोड नंबर : ममविम/ब.का/कुडाळ/०१/२०१८-१९**

निविदा फॉर्म खरेदीदाराचे नांव व पत्ता :
--------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------
पॅन क्रमांक : ______________________________
दूरध्वनी क्रमांक ........................... मोबाईल नं. ..........................

किंमत : रु. १०००/-

पावती क्र. : .................
दिनांक : ......../......../२०१८

# महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ, मर्यादित.मुंबई

**( महाराष्ट्र शासनाचा उपक्रम )**

**महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ, कुडाळ, जि. सिंधुदूर्ग येथील ३० टन प्रति दिवस क्षमतेचा बर्फ कारखाना १० टनी शितगृहासह आहे त्या स्थितीत ठेक्याने चालविणेबाबत**

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | विवरण | पान क्रमांक |
|---|---|---|
| १ | निविदा सुचना | ०१ |
| २ | निविदा फॉर्म "अ" ( तांत्रिक ) | ०२ |
| ३ | निविदा "अ "व "ब " भरण्याबाबत पध्दत व सुचना | ०३-१४ |
| ४ | निविदा फॉर्म ब ( वाणिज्यिक) | १५ |

# महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई

( महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

**मुख्य कार्यालयाचा पत्ता** : ३ रा मजला, एम.के.एम. इंटरनॅशनल हाऊस, जिवन विमा महामंडळ
( योगक्षेम) च्या मागे, बाबुभाई एम.चिनॉय मार्ग, मुंबई-४०० ०२१.
दुरध्वनी क्र. (०२२) २२०६०१४ / २२०५०२२ ई-मेल-mfdc@rediffmail.com

## निविदा सुचना

महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळाचा खालील बर्फ कारखाना आहे त्या स्थितीत ठेक्याने चालवायला देण्यासाठी सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे.

| अनु. क्र. | बर्फ कारखान्याचे नांव व ठिकाण | कालावधी | क्षमता | बयाना रक्कम (रु.) | अनामत रक्कम (रु.) | निविदा किंमत (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कुडाळ बर्फ कारखाना,प्लॉट नं. ४४ कुडाळ एम.आय.डी.सी., जि.सिंधुदुर्ग. | ५ वर्ष | ३० टनी प्रति दिवस | १,००,०००/- | प्रथम वर्षाच्या ठेका रककमे इतकी | १,०००/- |

अनुभवी असलेल्या व्यक्ती /संस्था/कंपनी / ठेकेदार यांचेकडून दिनांक १४/१२/२०१८ रोजी दुपारी १.०० वा. पर्यंत सिलबंद निविदा स्विकारण्यात येतील. प्राप्त निविदा शक्य झाल्यास त्याच दिवशी ३.०० वाजता महामंडळाचे मुख्य कार्यालयात वरील पत्यावर उपस्थितांसमोर उघडण्यात येतील. उच्चतम दर नमुद केलेल्या ठेकेदाराचीच निविदा मंजुर करण्यात येईल.

निविदा जाहिरात व निविदा पत्राचा मसुदा www.maharashtra.gov.in या वेबसईट वरुन सुध्दा डाउनलोड करता येतील. अशा परिस्थितीत निविदा पत्राची रक्कम निविदा महामंडळाकडे भरतेवेळी रोखीने भरणा करणे आवश्यक आहे.

विहित नमुन्यातील कोऱ्या निविदा संच महामंडळाच्या मुख्य कार्यालयात उपलब्ध असून त्या दिनांक २१/११/२०१८ पासून दिनांक १३/१२/२०१८ पर्यंत कार्यालयीन दिवशी वेळ सकाळी ११.०० ते ५.०० या वेळेत उपलब्ध होईल.

व्यवस्थापकीय संचालक

**महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ, मर्यादित.मुंबई**
**(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम )**
**मुख्य कार्यालय पत्ता** : ३ रा मजला, एन्.के.एम्.इन्टर नॅशनल हाऊस, बाबुभाई एम्.चिनाय मार्ग,
एल.आय.सी. (योगक्षेम) इमारतीच्या मागे, चर्चगेट, मुंबई -४०० ०२१.
टेलीफॅक्स ०२२-२२०२६०१४,२२०२५०२२. इमेल : mfdc@rediffmail.com

**महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ, कुडाळ, जि. सिंधुदुर्ग येथील ३० टन प्रति दिवस क्षमतेचा बर्फ कारखाना १० टनी शितगृहासह आहे त्या स्थितीत ठेक्याने चालविणेबाबत**

**निविदा नमुना "अ "( तांत्रिक )**

१) निविदा क्रमांक : ममविम/ब.का.कुडाळ/२०१८-१९/..............

२) निविदा स्विकारण्याची अंतिम तारीख वेळ व ठिकाण : महामंडळाचे मुख्य कार्यालय,मुंबई येथे दि. १४/१२/२०१८ रोजी दुपारी. १.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील

३) उघडण्याची अंतिम तारीख, वेळ व ठिकाण : महामंडळाचे मुख्य कार्यालय,मुंबई येथे वरील पत्त्यावर दि. १४/१२/२०१८ रोजी दु. ०३.०० वाजता निविदा उघडण्यात येतील.

४) ठेका कालावधी : ५ वर्षे ( करारनाम्याच्या तारखेपासून निविदेच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून)

५) पॅन कार्ड क्रमांक (छायाप्रत जोडावी ) :

६) ३ वर्षाचे आयकर भरणा प्रमाणपत्र (छायाप्रत जोडावी): आहे / नाही

७) विक्रीकर नोंदणी प्रमाणपत्र (छायाप्रत जोडावी ) : आहे / नाही

८) सध्याच्या व्यवसायासंबंधी माहिती संपूर्ण पत्यासह (सोबत जोडावी) :

निविदेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

निविदा धारकाची स्वाक्षरी व शिक्का

नांव व पत्ता :......................................................
.........................................................................
दूरध्वनी क्र. : ........................ मोबाईल क्र.................................

# निविदा "**अ**" व "**ब**" भरण्याची पध्दत व नियम

**निविदा दोन लिफाफे पध्दतीनुसार स्विकारण्यात येतील. ( Two Bids)**

| | | |
|---|---|---|
| निविदा " अ " | - | तांत्रिक निविदा |
| निविदा " ब " | - | वाणिज्यिक निविदा |

**अ) लिफाफा "अ" ( तांत्रिक ) :**

१) विहीत नमुन्यातील निविदा "अ" तांत्रिक निविदा धारकाने स्वत: माहिती भरुन व स्वाक्षरी करुन एका कोऱ्या लिफाफ्यात संबंधीत कागद पत्रासह जोडून सिलबंद करावे.

२) या लिफाफ्यावर निविदा "अ" तांत्रिक असे नमुद करावे.

३) निविदा धारकाने निविदा "अ" सोबत बयाणा रक्कमेपोटी रु. १,००,०००/- रोख भरल्यास पावतीची छायाप्रत किंवा राष्ट्रीयकृत बॅकेची **Maharashtra Fisheries Development Corporation Ltd., Mumbai** यांचे नावे देय असलेली दर्शनी हुंडी ( डिमांड ड्राफ्ट ) सोबत जोडणे आवश्यक राहील. ( बयाणा रक्कमेविना सादर झालेली निविदा स्विकारण्यात येणार नाही.)

४) विक्री कर नोंदणीप्रमाण पत्राची छायाप्रत तसेच विक्रीकर / जी.एस.टी भरणा केलेले प्रमाणपत्र किंवा विक्रीकर प्रमाणपत्राची प्रमाणीत छायाप्रत जोडावी.

५) तीन वर्षाचे ऑडीटेड आयकर भरणा प्रमाणपत्राची अद्यावत प्रमाणिती नफा तोटा पत्रक व ताळेबंदासह छायाप्रती जोडावेत. तसेच पॅन कार्डाची छायाप्रत प्रमाणीत करून जोडावी.

६) शासनाचा किंवा शासकीय महामंडळाचा देणेकरी (Defaulter) नसल्याबाबत रू. १०० च्या स्टँम्प पेपरवर स्वयंम घोषणापत्र जोडणे बंधनकारक राहील.

७) निविदा धारकाने स्वत:चे कंपनीच्या व्यवसायाबद्दलचा संपूर्ण तपशील लेखी स्वरुपात सोबत जोडावा तसेच भागीदारी कंपनी असल्यास त्याचे पार्टनरशी डीड जोडावे.

८) बर्फ कारखाना चालवायचा अनुभव असल्यास त्याबाबतच्या अनुभवाचे प्रमाणपत्र प्रमाणीत करून जोडावे.

**ब) लिफाफा ब (वाणिज्यिक ):**

१) विहीत नमुन्यातील निविदा " ब " निविदा धारकाने स्वत:करुन माहिती भरुन व स्वाक्षरी करुन निविदा संचासह सिलबंद करावे.

२) यामध्ये बर्फ कारखाना चालविण्याकरिता वार्षिक ठेका रक्कम सुरूवात अंकात व अक्षरात नमुद करावी. ५ वर्षाची ठेका रक्कम एकत्र दर्शविण्यात येवू नये.

३) निविदेमध्ये नमुद केलेली ठेका रक्कम ही पाच वर्षापर्यंत भरणे बंधनकारक राहील.

४) या लिफाफ्यावर निविदा " ब " वाणिज्यिक असे नमुद करावे.

**क) निविदा धारकाना सुचना (नियम/अटी) :**

१) निविदा "अ"ज्या लिफाफ्यात सिलबंद केली असेल त्यावर तांत्रिक निविदा व निविदा " ब " ज्या लिफाफ्यात सिलबंद केली असेल त्यावर वाणिज्यिक निविदा असे स्पष्टपणे नमुद करावे व दोन्ही लिफाफे "अ"व "ब" एका मोठया लिफाफ्यात सिलबंद करावे. लिफाफ्यावर कामाचे नांव,निविदा क्रमांक व निविदा धारकांचा संपूर्ण पत्ता लिहावा व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचे नावे सादर करावे.

२) सदरील निविदा भरावयाच्या पध्दतीमधील कुठल्याही प्रकारच्या त्रुटीबाबत किंवा वादविवादाबाबत महामंडळाचा निर्णय अंतीम व सर्वासाठी बंधनकारक असेल.

३) बयाणा रक्कम : रु. १,००,०००/- (रूपये एक लक्ष मात्र रोख पावती क्र.............. / डी.डी.क्र...................... दि. ...../..../२०१८, बँकेचे नांव ..................................................

४) ज्या निविदा धारकाची तांत्रिक निविदा (लिफाफा "अ") अटी व शर्तीनुसार स्विकारण्यात येईल त्याचीच वाणिज्यिक निविदा (लिफाफा "ब") उघडण्यात येईल.

५) महामंडळाने निर्धारित केलेल्या दिवसापर्यंत व वेळेपर्यंत आलेल्या निविदा विचारात घेण्यात येतील. निर्धारित दिवस व वेळेनंतर प्राप्त होणारी निविदा विचारात घेतली जाणार नाही.

६) महामंडळाने कुडाळ येथील ३० टन प्रति दिवस क्षमतेचा बर्फ कारखाना व १० टन क्षमतेचे शितगृह चालवायचा ठेका कालावधी ५ वर्षे निर्धारित केलेला आहे.

७) ज्या निविदा धारकाची निविदा स्विकारल्यानंतर महामंडळाने ठेका रक्कम भरणेसाठी दिलेले पत्र प्राप्त झाल्यापसून निविदाधारकास दहा (१०) दिवसाचे आंत प्रथम वर्षाची आगावू ठेका रक्कम दर्शनी हुंडीने भरावी लागेल. अन्यथा निविदाधारकाचा कोणताही हक्क याबाबत राहणार नाही.

८) निविदा धारकाची निविदा स्विकारल्यानंतर सुरक्षा ठेव भरणेसाठी महामंडळाचे पत्र प्राप्त झाल्यापासून १० दिवसाचे आंत प्रथम वर्षाच्या ठेका रकमे एवढी सुरक्षा ठेव राष्ट्रीयकृत बँकेची **Maharashtra Fisheries Development Corporation Ltd.,Mumbai** याचे नांवे देय असलेली दर्शनी हुंडीने महामंडळाकडे जमा करुन रु.५००/- च्या स्टँम्पपेपरवर (बाँडपेपर) वैधानिक करारनामा करणे बंधनकारक राहील. स्टँम्पपेपरचा (बाँडपेपर) खर्च ठेकेदारास करणे बंधनकारक राहील. तसेच सही केलेले ३ कोरे धनादेश महामंडळाकडे महामंडळाचे नांवे सुरक्षा म्हणून जमा करणे बंधनकारक राहील.

९) स्विकृत निविदाधारक विहीत कालावधीत हजर राहू न शकल्यास किंवा ठेका रक्कम व सुरक्षा ठेव रक्कम भरण्यास असमर्थ ठरल्यास त्याची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल व इतर अनुज्ञेय ठेकेदाराबरोबर अंतिम करारनामा करण्यात येईल.

१०) ज्यांच्या निविदा अस्विकृत ठरतील त्यांच्या इसाऱ्याची रक्कम त्यांना परत करण्यात येईल. त्यावर कोणतेही प्रकारचे व्याज अनुज्ञेय राहणार नाही.

११) निविदाधारक महामंडळाचा किंवा मत्स्यव्यवसाय विभागाचा थकबाकीदार नसावा.

१२) महामंडळास सादर केलेली माहिती खोटी आढळल्यास इसारा रक्कम जप्त करुन ठेका रद्द करण्याचे अधिकार महामंडळास राहतील.

१३) निविदा मंजूर झाल्यानंतर सदर व्यवसायाकरिता आवश्यक असणारे परवाने मिळविणे (आवश्यक असल्यास) हे निविदा धारकाची जबाबदारी राहील.

१४) बर्फ कारखाना चालविणेसाठी करावा लागणारा मशीनरी व्यवस्थापन खर्च ( उदा. दुरुस्ती सर्व्हिसिंग काही साहित्य तुटल्यास किंवा खराब झाल्यास नविन टाकणे इत्यादी सह सर्व खर्च ठेकेदाराने करणे बंधनकारक राहील.

१५) तसेच महसूली खर्च जसे व्रिक्रीकर, आयकर, पाणीबील, विद्युत बील, विमा पॉलीसी व इतर सर्व कर व व्यवस्थापन खर्च, महामंडळाने बर्फ कारखाना करीता इतर संबंधीत विभागाचे आतापर्यत प्राप्त केलेले परवानेनुसार पुढिल देय फी इत्यादी ठेकेदाराने करणे बंधनकारक राहील.

१६) करारनामा झाल्यानंतर ताबा दिलेल्या तारखेपासून वर्ष प्रारंभ होईल त्यानुसार दरदिवशीचे बर्फ उत्पादनाचे रेकॉर्डस महामंडळास सादर करणे बंधनकारक राहील.

१७) निविदा धारकाने बर्फ कारखाना चालविण्यासाठी लागणारा एक तांत्रिक अधिक्षक व दोन कुशल कामगार व दोन वॉचमन ठेवणे बंधनकारक राहील.

१८) ठेकेदाराने निविदेच्या प्रत्येक पानावर स्वाक्षरी केलेली असावी.

१९) या निविदा संचातील कोणतेही पान न काढता ठेकेदाराने स्वाक्षरी करुन हा निविदा संच "अ"

लिफाफ्यात सिलबंद करुन पाठवावा. तसेच वाणिज्यिक निविदा "ब" दुसऱ्या स्वतंत्र लिफाफ्यामध्ये सिलबंद करुन पाठवावा.

२०) निविदा स्पीडपोस्ट / रजिस्टर पोस्टाने/स्वत: दि. १४/१२/२०१८ रोजी दु. १.०० वाजेपर्यंत पोहचतील असे पाठवावे. उशिरा प्राप्त झालेली निविदा स्विकारली जाणार नाही.

२१) निविदाधारक महाराष्ट्राचा कमीत कमी १५ वर्षांचा रहिवाशी असावा.

२२) कोणतीही निविदा कारणे न देता नाकारणे किंवा स्विकारणे याचा हक्क महामंडळाने राखून ठेवलेला आहे.

२३) निविदेमध्ये ठेकेदाराने स्व:ताच्या अटी व शर्ती नमुद करु नये अन्यथा कोणतीही अट आढळून आल्यास अशी निविदा स्विकारणे अथवा नाकारणे याचा अधिकार महामंडळाचा राहील.

२४) वैधानिक करारनाम्यातील अटी व शर्ती पुढील प्रमाणे राहातील.

**अटी व शर्ती**

**१)** वेळोवेळी घेण्यात येणाऱ्या शासन निर्णयास अधिन राहून ठेका व इतर बाबी अवलंबून राहतील. यासाठी कोणत्याही स्वरूपाची नुकसान भरपाई देण्यात येणार नाही.

**२)** सदर बर्फ कारखाना एम.आय.डी.सी., कुडाळ यांचे क्षेत्रात असून त्यांचे नियमाचे पालन करणे बंधनकारक राहील.

**३) मालकी हक्क :**

बर्फ कारखान्याचा संपूर्ण मालकी हक्क **महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळाचे राहील. बर्फ कारखान्यामध्ये कोणताही** फेरबदल लेखी पूर्व परवानगीशिवाय करता येणार नाही. बर्फ कारखाना इमारती मधील खुली जागेचा वापर महामंडळ करेल. तसेच ऑफिसचा वापर महामंडळ करेल यावर ठेकेदाराची कोणतीही हरकत राहणार नाही.

४) बर्फ कारखान्याची **मालमत्तेची सुरक्षितता** :

बर्फ कारखान्याच्या अंतर्गत इमारत, यंत्रसामुग्री, विद्युत सामुग्री सह भिंतीच्या आतील मालमत्तेचा संबंध राहील. याबाबत मालमत्तेची सविस्तर यादी देण्यात येईल.

४.१) बर्फ कारखाना जागेची, इमारतीची, यंत्रसामुग्रीची व इतर मालमत्तेची सुरक्षितता, देखरेख व साफसफाई ठेवणे ठेकेदारावर बंधनकारक राहील. तसेच इमारत, गेट, दरवाजा, इन्सूलेशन, कॉम्प्रेसर व कन्डेन्सर पॅनल यास हानी पोहचणार नाही याची काळजी घेण्याची जबाबदारी ठेकेदारावर राहील. याबाबत काही समस्या उदभवल्यास ठेकेदाराने महामंडळाचे परवानगीने दुरूस्ती करून घेणे बंधनकारक राहील.

४.२) बर्फ कारखाना इमारत, यंत्रसामुग्री तसेच विद्युतीकरण यांची ठेका काळातील दुरुस्ती ठेकेदारास करावी लागेल. महामंडळ यासाठी कोणताही खर्च देणार नाही.

४.३) बर्फ कारखाना सुस्थितीत ठेवण्याकरिता दुरुस्ती सर्व्हिसिंग वेळोवेळी करणे ठेकेदारास बंधनकारक राहील.

४.४) कॉम्प्रेसरची दुरुस्ती किर्लोस्कर कंपनीचा अधिकृत अभियंता/तांत्रिक कामगारांकडून करुन घेणे ठेकेदारास बंधनकारक राहील.

**५) कार्य / काम :**

बर्फ कारखाना चालवायचा ठेका म्हणजेच ठेकेदाराने २० टनी प्रतिदिवस क्षमतेनुसार बर्फाचे उत्पादन घेणे व विक्री करणे तसेच इमारत यंत्रसामुग्री व परिशिष्ट मधील साहित्य इत्यादीची देखरेख करणे व सुस्थितीत ठेवणे बंधनकारक राहील.

५.१) बर्फ उत्पादनाकरिता कच्च्या मालाची व्यवस्था ठेकेदारास करावी लागेल.

५.२) बर्फ विक्री करिता लागणारी व्यवस्था, आवश्यक असणारे परवाने मिळविणे ठेकेदारास बंधनकारक राहील.

५.३) बर्फ टाकीमधील बर्फ पाडण्यासाठी व्यवस्था स्वत: ठेकेदाराने करणे बंधनकारक राहील. त्यासाठी लागणारा कुशल कामगार ठेकेदाराने नियुक्त करावा. सदर कामगारांशी महामंडळाचे कोणतेही संबंध रहाणार नाही.

५.४) बर्फ उत्पादनाकरिता लागणाऱ्या आवश्यक बाबी वीज, पाणी, मीठ, अमोनिया इत्यादी बाबींची व्यवस्था व त्यांची देयके वेळच्या वेळी अदा करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

५.५) बर्फ कारखान्यासाठी लागणारी विजेची व्यवस्था महामंडळाची असली तरी त्याची देयके वेळच्या वेळी भरणे ठेकेदारावर बंधनकारक राहील.

**६) <u>व्यवस्थापनाबाबत :</u>**

६.१) बर्फ कारखान्यातील कोणत्याही समस्या निर्माण झाल्यास किंवा नुकसान झाल्यास त्याची संपूर्णपणे पूर्तता ठेकेदारास करावी लागेल. त्याची माहिती संबंधीत महामंडळाच्या अधिकारी किंवा कर्मचारी यांना देण्यात यावी.

६.२) बर्फ कारखान्याची इमारत, यंत्रसामुगी, विद्युत सयंत्र व इतर मालमत्तेचे नुकसान होईल असे कोणतेही कृत्य ठेकेदाराच्या कामगारांकडून किंवा इतर दुसऱ्याकडून होणार नाही याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

६.३) बर्फ कारखान्यासंबधी विविध शासकीय / निमशासकीय कार्यालयाचे उदा. एम. आय. डी. सी. एम.ई.सी.बी., ग्रामपंचायत, उद्योग विभाग, अग्निशमन विभाग, विस्फोटक विभाग, प्रदुषण विभाग व इतर कार्यालय यांच्या नियमांचे पालन करणे ठेकेदारास बंधनकारक राहील.

६.४) बर्फ कारखान्याचा आवश्यक परवाना (फॅक्टरी लायसन्स) नुतनीकरण करणे ठेकेदारास बंधनकारक राहील.

**<u>७) ठेका मुदत ( निर्धारित कालावधी ) :</u>**

बर्फ कारखाना ठेक्याने चालवायला देण्याचा कालावधी करारनामा झाल्यानंतर ताबा दिलेल्या तारखेपासून सुरु होवून ५ वर्षे राहील. महामंडळाने निश्चित केलेल्या तारखेपुर्वी ठेका रक्कम भरणे ठेकेदारावर बंधनकारक राहील.

**८) <u>प्रशासकीय बाब :</u>**

सदर बर्फ कारखान्यामध्ये ठेकेदाराने ठेवलेल्या ठेकेदाराच्या कामगारांना ओळखपत्र ठेकेदाराने द्यावेत. बर्फ कारखान्याशी संबंध नसलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीस इमारतीत प्रवेश देवू नये. महामंडळाच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी ओळखपत्राची मागणी केल्यास ओळखपत्र दाखवावे लागेल. कामगार कायद्यानुसार १८ वर्षाखालील कामगार ठेकेदाराने कामावर ठेवू नये.

८.१) ठेकेदाराने सदर बर्फ कारखान्याचा उपयोग फक्त बर्फ उत्पादनासाठी व बर्फ विक्रीसाठीच करावा. याशिवाय इतर कोणत्याही कारणासाठी करण्यात येवू नये.

८.२) बर्फ कारखान्याचे हक्क महामंडळाकडे असून आवश्यक बाबीची अमंलबजावणी करताना महामंडळाच्या सक्षम अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांनी दिलेल्या निर्देशाचे पालन ठेकेदाराने करणे बंधनकारक राहील.

**<u>९) नुकसान भरपाईबाबत :</u>**

९.१) कोणत्याही तांत्रिक कारणामुळे बर्फ कारखाना बंद राहील्यास किंवा बर्फ उत्पादन कमी झाल्यास तसेच नैसर्गीक आपत्ती अथवा सामाजिक आपत्ती किंवा अनियमित, पाणीपूरवठा किंवा विद्युत पूरवठा इत्यादी कारणामुळे बर्फ उत्पादन होवू न शकल्यास कोणतीही नुकसान भरपाई महामंडळाकडून मिळणार नाही. तसेच मुदतवाढही देण्यात येणार नाही.

९.२ ) सदर बर्फ कारखाना चालविण्यासाठी ठेकेदाराने ठेवलेल्या कामगारांनी बेकायदेशीर कृत्य केल्यास त्यास ठेकेदार जबाबदार राहील. तसेच महामंडळाच्या मालकीचे कोणतेही साहीत्य, इमारत, यंत्रसामुग्री, विद्युत सयंत्रणा व इतर मालमत्ता यांचे कोणतेही नुकसान होणार नाही याची संपूर्ण जबाबदारी ठेकेदारावर राहील. सदर कारणांमुळे महामंडळाचे नुकसान झाल्यास सक्षम अधिकाऱ्याने तपासणी करुन ठरविल्याप्रमाणे नुकसान भरपाई ठेकेदारास भरणे बंधनकारक राहील.

**१०) <u>मत्स्य सहकारी संस्थेस व मासेमारीसाठी जलाशय असलेल्या ठेकेदारास प्राधान्य देणेबाबत</u> :**

बर्फ कारखाना मुख्यत: मत्स्यव्यवसायासाठी उभारण्यात आलेला असल्यामुळे मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना तसेच मासेमारीसाठी जलाशय असलेल्या ठेकेदारांना निविदेमध्ये प्राधान्य राहील. तसेच बर्फ कारखाना चालवितांना मत्स्यव्यवसायकांनी बर्फाची मागणी केल्यास प्रथम प्रधान्याने त्यांना विक्री करणे ठेकेदारास बंधनकारक राहील.

**११) <u>बर्फ उत्पादनाबाबत :</u>**

११.१)ठेकेदाराला बर्फ उत्पादनासाठी लागणारा खर्च उदा. कच्चा माल, मीठ, अमोनिया आणण्यासाठी तसेच बर्फ विक्रीसाठी किंवा वाहतूकीसाठी स्वत: व्यवस्था करावी लागेल. तसेच याबाबत लागणारा सर्व खर्च ठेकेदारास करावा लागेल.

११.२) बर्फ उत्पादन पूर्ण क्षमतेने काढण्याची जबाबदारी ठेकेदाराची स्वत:ची राहील. पूर्ण क्षमतेने बर्फ उत्पादन न केल्यास नुकसान झाले म्हणून कोणत्याही तक्रारीचा विचार केला जाणार नाही.

११.३) ठेकेदाराने बर्फ उत्पादन व विक्री संबंधी आकडेवारी दरमहा महामंडळाच्या मुख्य कार्यालयास विहीत प्रपत्रात पाठवावी.

११.४) ठेकेदाराने सदर बर्फ कारखान्यासाठी प्रति दिवस ३० टन क्षमते एवढेच बर्फ उत्पादन करावे. यापेक्षा जास्त उत्पादन केल्यास व यंत्रसामुग्रीचे नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी ठेकेदाराची

राहील. तसेच सर्व यंत्रसामुग्रीची नुकसान भरपाई ठेकेदाराकडून वसुल केली जाईल. याबाबत व्यवस्थापकीय संचालकांचे अधिकार व निर्णय अंतिम व ठेकेदारास बंधनकारक राहतील.

**१२) इतर कामे करण्याबाबत :**

महामंडळाचा बर्फ कारखान्यावर पुर्ण ताबा असून बर्फ कारखाना इमारत वगळता उर्वरित जागेत करार मुदतीमध्ये महामंडळामार्फत कार्यान्वीत असलेली व कार्यान्वीत होणारी कामे अबाधीत राहतील. बर्फ कारखान्या व्यतिरिक्त इतर जागेवर ठेकेदाराचा कोणताही अधिकार राहणार नाही व सदर जागा ठेकेदाराने इतर कामासाठी परवानगीशिवाय वापरु नये.

**१३) कारखाना पोट भाडयाने न देण्याबाबत :**

ठेकेदाराला बर्फ कारखाना चालवायला दिलेला ठेका दुसऱ्या ठेकेदाराला हस्तांतरीत करता येणार नाही असे आढळून आल्यास ठेका रद्द करण्यात येईल व सुरक्षा रक्कम जप्त करुन महामंडळास झालेल्या नुकसानीबाबत ठेकेदाराकडून नुकसान भरपाई वसुल करण्यात येईल.

**१४) मासिक देयके भरणा करणेबाबत :**

बर्फ कारखाना चालविण्याकरिता लागणारा उत्पादन खर्च तसेच ठेकेदाराने बर्फ उत्पादन करतांना बर्फ कारखान्याच्या संबंधी इलेक्ट्रीक देयके, कर्मचाऱ्यांचे वेतन तसेच संबंधीत इतर देयके वेळच्या वेळी दरमहा देय असणारे सर्व देयके, विक्रीकर, व्यवस्थापन खर्च इ. नियमानुसार महिन्याच्या १० तारखे पर्यत भरणा करणे ठेकेदारावर बंधनकारक राहील.

ठेकेदाराने बर्फ कारखाना ठेक्याने चालवितांना उत्पादनासाठी आवश्यक देयके न भरल्यास सदर देयकाची रक्कम ठेकेदाराकडून वसुल करण्यात येईल. याबाबत ठेकेदाराने टाळाटाळ केल्यास संबंधीत ठेकेदाराचा ठेका त्वरीत रद्द करण्यात येवून फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल.

**१५) तक्रारीबाबत :**

ठेकेदाराने बर्फ कारखान्यासंबंधी कोणतीही तक्रार असल्यास महामंडळाकडे लेखी सादर करावी.

**१६) गैरव्यवहाराबाबत :**

ठेकेदाराने किंवा त्याच्या कामगारांनी महामंडळाच्या बर्फ कारखान्यामध्ये काही गैर व्यवहार केल्यास ( उदा. पाणी किंवा विद्युत पूरवठाबाबत) महामंडळ जबाबदार राहणार नाही. त्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदारावर राहील. अशा कार्यामुळे महामंडळाचे नुकसान झाल्यास महामंडळाने मागणी केल्याप्रमाणे नुकसान भरपाई ठेकेदाराला महामंडळाला अदा करावी लागेल अन्यथा त्याची सुरक्षा ठेव जप्त करण्यात येईल व ठेका रद्द करण्यात येईल.

**१७) साहित्य न हलविण्याबाबत :**

महामंडळाच्या बर्फ कारखान्याच्या आवारात व इमारतीत असलेले महामंडळाच्या मालकीचे साहित्य महामंडळाच्या अधिकारी वर्गाच्या लेखी परवानगीशिवाय ठेकेदाराने इतरत्र हलवू नये.

**१८) <u>मालमत्तेत फेरबदल न करणेबाबत</u>** :

बर्फ कारखान्याच्या संबंधी महामंडळाची चल/अचल मालमत्तेत कोणताही फेरबदल महामंडळाच्या परवानगीशिवाय करता येणार नाही.

बर्फ कारखान्यात जे काही ठेकेदाराकडून दुरुस्ती अथवा भांडवली खर्च करण्यात येईल. त्याचा कोणताही परतावा कोणत्याही परिस्थितीत महामंडळाकडून केला जाणार नाही.

**१९) <u>बर्फ कारखान्यासंबंधी आवश्यक शुल्क भरणा करण्याबाबत</u>**

१९.१) बर्फ कारखान्यासंबंधी इतर विभागाची फी उदा. कारखाने निरिक्षक कार्यालय फी, आगविमा अग्नीशमन विभाग, अग्नीशमन साहित्य रिफिलिंग करणे, कारखाना यंत्र तपासणी फी, कारखाना परवाना फी, प्रदुषण नियंत्रण मंडळ फी, एक्स्लोझीव विभागाची फी, वजने / मापे विभागाची फी इत्यादी बाबतची भरणा करणे ठेकेदारावर बंधनकारक राहिल. तसेच याबाबतची सर्व कागदोपत्री कारवाई करून परवानग्या घेण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

१९.२) विक्रीकर खात्याच्या प्रचलित नियमानुसार बर्फ विक्री कर तसेच आयकर, इत्यादी बाबी सुध्दा ठेकेदाराने नियमाप्रमाणे भरणा करणे बंधनकारक राहील.

**२०) <u>बर्फ कारखाना तपासणीबाबत</u>** :

बर्फ कारखाना तपासणीकरिता एम.ई.सी.बी.चे, शासनाचे, अग्नीशमन विभागाचे, प्रदुषण विभागाचे, कारखाना निरिक्षक विभागाचे, एम.आय.डी.सी.चे, संबंधीत शासनाचे व महामंडळाचे अधिकाऱ्यांना तपासणी करु देणे ठेकेदारावर बंधनकारक राहिल. त्यांनी दिलेल्या सुचनानुसार महामंडळास लेखी कळविणे व त्यानुसार योग्यती कार्यवाही करणे ठेकेदारास आवश्यक राहील.

**२१) <u>बंद काळात सर्व्हिसिंग / दुरुस्तीबाबत :</u>**

२१.१) बर्फ कारखान्यातील यंत्रसामुग्रीची निगा ठेवण्याच्या दृष्टीने दरवर्षी (शासनाच्या नियमाप्रमाणे मासेमारी बंद काळात ) यंत्रसामुग्रीची सव्हिर्सिंग, ऑईलिंग, रिपेरिंग, पेंटीग करणे ठेकेदारास बंधनकारक राहील. याकरिता येणारा खर्च ठेकेदारास करावा लागेल. त्यासंबंधी कोणताही परतावा महामंडळाकडून मिळणार नाही.

२१.२) बर्फ कारखान्यातील यंत्रसामुग्रीस किंवा इतर साहित्यास ठेकेदाराकडून किंवा त्यांच्या प्रतिनिधीकडून / कामगारांकडून इतर असामाजिक घटकांकडून हानी पोहचल्यास त्यांची दुरुस्ती किंवा पुर्तता ठेकेदारास स्वखर्चाने करून द्यावी लागेल.

**२२) <u>अग्नी प्रतिबंधक साधणे :</u>**

बर्फ कारखान्यात महामंडळाने अग्नीप्रतिबंधक साधने आवश्यक असल्यास उपलब्ध करावी व त्याचा आवश्यक तेव्हा वापर करावा. सदर साहित्याची निगा राखावी. अग्नीशमन उपकरण वेळेपूर्वी प्रती

वर्षी भरुन घेण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील व त्याकरिता येणारा खर्च ठेकेदाराला स्वत: करावा लागेल.

**२३) <u>अमोनिया गॅसबाबत :</u>**

ठेकेदारास प्रदुषण विषयक कायद्याचे पालन करणे बंधनकारक राहील. बर्फ कारखान्यामध्ये अमोनिया वायुचे सिलेंडर असून त्याची निगा ठेवणे व कमी असल्यास भरणा करणे आवश्यक आहे. अमोनिया लिकेजमुळे कोणत्याही प्रकारची समस्या उदभवल्यास तसेच विद्युतीकरणामुळे स्फोट इ. झाल्यास त्यास ठेकेदार स्वत: जबाबदार राहील व याकरिता येणारी सर्व प्रकारची शासकीय किंवा वैयक्तीक नुकसान भरपाई ठेकेदारास करावी लागेल.

**२४) <u>वेतन भत्ते :</u>**

बर्फ कारखान्यामध्ये कामगार कामास ठेवल्यास त्यांचे वेतन भत्ते, व्यवसाय कर, विमा किंवा अन्य भत्ते व त्यांची सेवा यांची संपूर्ण जबाबदारी ठेकेदाराची राहील. तो ठेकेदाराचा कामगार राहील. सदर कामगाराचा महामंडळाशी कोणताही संबंध राहणार नाही.

**२५) <u>श्रमिक भरपाईबाबत</u>** :

महामंडळाचे कर्मचारी / कामगारांना कामावर असतांना झालेल्या दुखापती / अपघात या बाबींना ठेकेदार जबाबदार राहील. अपघातामुळे शारीरिक इजा झालेल्या कामगारांला वैद्यकीय खर्च किंवा कामावर असतांना एखादा कामगाराचा मृत्यु झाल्यास महामंडळाकडून कोणतीही आर्थिक मदत किंवा नुकसान भरपाई दिली जाणार नाही. याची संपूर्ण जबाबदारी ठेकेदाराची असेल. तसेच कामावर असतांना कामगारास मानसीक व सामाजिक इजा झाल्यास त्यास महामंडळ जबाबदार राहणार नाही. ती पूर्णपणे ठेकेदाराची जबाबदारी राहील. कामगार कायद्याचे अनुपालन करणे ठेकेदारास बंधनकारक राहील.

**२६) <u>वार्षिक रक्कम भरणा करणे :</u>**

ठेकेदारास वार्षिक ठेका रक्कम प्रतिवर्षी आगाऊ  स्वरुपात वर्ष सुरु होण्यापूर्वी नमुद केलेल्या तारखेच्या आंत भरणा करणे बंधनकारक राहील. देय तारखेपासून ३० दिवसाच्या आंत थकीत रक्कम जमा न केल्यास महामंडळाकडून ठेका रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येईल व थकीत रक्कमेवर दरसाल दर शेकडा १५% व्याज आकारले जाईल तसेच ठेकेदाराची संपूर्ण अनामत रक्कम जप्त करुन समपहरण करण्यात येईल. याबाबत ठेकेदाराची कोणतीही हरकत राहणार नाही.

**२७) इसारा रक्कम प्रतिभूती ठेवीत जमा करणे** :

ठेकेदाराने प्रतिभूती रक्कम जमा करतांना त्यामध्ये महामंडळाकडे जमा असलेली इसाराची रक्कम ठेकेदाराने विनंती केल्यास प्रतिभूती ठेवीत हस्तांतरीत करण्यात येईल.

**२८) प्रतिभुती ठेव परत करणे : ( अनामत रक्कम )**

ठेकेदाराने महामंडळाकडे जमा केलेल्या प्रतिभूती ( अनामत) रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज ठेकेदारास अदा केले जाणार नाही. ठेका कालावधी पूर्ण झाल्यानंतर महामंडळास कोणतीही रक्कम देय नसल्यास (ठेकेदाराने बर्फ कारखान्याबाबतची सर्व देयके दिलेली आहेत, याची पडताळणी करुन) प्रतिभूती रक्कम परत करण्यात येईल. परंतु महामंडळास कोणतीही थकीत रक्कम देय असल्यास व ठेकेदाराने येणे रक्कम वेळेवर जमा न केल्यास सदर रक्कम प्रतिभूतीमधून वळती करण्यात येईल. ठेका कालावधी पूर्ण होण्या अगोदर ठेका संपुष्टात आणल्यास ठेकेदाराची प्रतिभूती रक्कम जप्त केली जाईल व सदर रक्कमेचे समपहरण करण्यात येईल.

**२९) माहिती देणे, बैठकीस उपस्थित राहणे :**

महामंडळाला वेळोवेळी आवश्यक असणारी सर्व माहिती देण्याचे बंधन ठेकेदारावर असेल तसेच व्यवस्थापकीय संचालक ज्यावेळी ठेकेदारास बैठकीसाठी, चर्चेसाठी, उपस्थित राहण्यास कळवतील त्यावेळी ठेकेदारास स्वखर्चाने उपस्थित राहणे बंधनकारक राहील.

**३०) पहारेकरी :**

बर्फ कारखाना देखरेखीकरिता ठेकेदारास स्वखर्चाने पहारेकरी ठेवून बर्फ कारखाना मालमत्तेची सुरक्षितता ठेवावी लागेल. त्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील.

**३१) ठेका संपुष्टात आणण्याबाबत** :

खालीलपैकी कोणत्याही प्रसंगी ठेकेदाराला पोस्टाने लेखी सुचना पाठवून बर्फ कारखाना चालवायचा ठेका संपूष्टात आणण्याचा व ताबा घेण्याचा अधिकार महामंडळाने राखून ठेवला आहे. यास ठेकेदाराची कोणतीही हरकत राहणार नाही.

३१.१) ठेकेदारास न्यायालयाकडून दिवाळखोर ठरविण्यात आले अथवा त्याचा धंदा बंद करण्यात आला तर.

३१.२ ) आपल्या नावे असलेला ठेका दुसऱ्याच्या नांवे करुन दिला तर किंवा पोट ठेकेदार नेमण्यात आला तर.

३१.३) बर्फ कारखाना चालवायचा ठेका रक्कम दिलेल्या मुदतीत भरणा न केल्यास किंवा महामंडळाने सुचना देवूनही भरणा करण्यात आला नाही तर.

३१.४) बर्फ कारखान्यासंबंधी मासिक / वार्षिक देय बीले ठराविक मुदतीत भरणा करण्यात आली नाही तर.

३१.५) बर्फ कारखाना मालमत्तेचे (इमारत,यंत्रसामुग्री व इतर ) ठेकेदाराकडून नुकसान झाल्यास व महामंडळाने सुचना देवूनही दुरुस्ती / पूर्तता ठेकेदाराने केली नसल्यास.

३१.६) बर्फ कारखान्याबाबत शासनाने कोणताही धोरणात्मक निर्णय घेतला तर.

३१.७) ठेकेदाराने करारनाम्याच्या अटी व शर्तीचे पालन केले नाही तर ठेका संपुष्टात आणण्यात येईल.

३१.८) महामंडळाच्या / न्यायालयाच्या / एम.आय.डी.सी.च्या / शासनाच्या धोरणात्मक निर्णयामुळे अथवा काही अपरिहार्य कारणांमुळे सदर ठेका रद्द करावयाचा असल्यास महामंडळ सदर ठेकेदारास १५ दिवसाची लेखी नोटीस देवून ठेका संपुष्टात आणू शकते. यास ठेकेदाराची कोणतीही हरकत राहणार नाही.

**३२) <u>ठेका संपुष्टात आल्यावर यंत्रसामुगी चालू स्थितीत परत करण्याबाबत :</u>**

करार केल्यानंतर ताबा घेण्यापूर्वी ठेकेदाराने सर्व यंत्रसामुग्रीची आहे त्या स्थितीत तपासणी केलेली आहे व यांस ठेकेदाराची कोणतीही हरकत नाही. यात कोणताही बदल करुन देण्यास महामंडळ बांधील नाही. ठेकेदाराने ठेका संपुष्टात आल्यावर सर्व यंत्रसामुग्री हस्तांतरणाच्या ताबा घेतेवेळी ज्या स्थितीत होती त्याच स्थितीत महामंडळाला परत करणे बंधनकारक राहील. ती त्याच स्थितीत (ठेका संपुष्टात आल्यावर) नसल्यास ठेकेदाराने ती स्वखर्चाने दुरुस्त करुन देणे / नविन आणून देणे बंधनकारक राहील. याबाबतचा महामंडळाचा निर्णय अंतीम व ठेकेदारास बांधील राहील.

**३३) <u>प्रतिभूती ठेव रक्कम ( अनामत रक्कम) जप्त करुन समपहरण करणे :</u>**

वर नमुद केलेल्या अट क्र.३१ मधील ३१.१ ते ३१.८ क्रमांकापर्यंतच्या कोणत्याही अटीचा ठेकेदाराकडून भंग झाला तर किंवा ठेकेदाराला गंभीर आजार झाल्यामुळे किंवा त्याच्या मृत्युमुळे ठेका सोडून देण्यात आला तर किंवा ठेकेदाराने महामंडळासोबत केलेल्या करारनाम्यातील कोणत्याही अटी व शर्तीचा भंग केला तर महामंडळाच्या हिताच्या दृष्टीने संपुर्ण सुरक्षीत ठेका जप्त करुन समपहरण करणे किंवा कायदेशिर कार्यवाही करणे किंवा सदरहून रक्कम आणि योग्य ते येणे असलेली कोणतीही इतर रक्कम भरण्यास ठेकेदाराने कसूर केल्यास महामंडळ उपलब्ध असलेल्या इतर उपाय योजनेस बाधा न येता

सदरहून रक्कम जमीन महसूलाची थकबाकी म्हणून वसूल करता येईल ठेकेदाराची चल / अचल मालमत्ता जप्तीबाबत आर. आर.सी. कार्यवाही सुध्दा करण्यात येईल. याकरिता अधिकार महामंडळाच्या वतीने व्यवस्थापकीय संचालक याना राहील.

**३४) <u>व्यवस्थापकीय संचालकांना अधिकार :</u>**

ठेकेदाराने बर्फ कारखाना चालवायचा ठेका मिळाल्यानंतर कोणताही वादविवाद निर्माण झाल्यास त्याविषयी ठेकेदाराला १५ दिवसांचे आंत व्यवस्थापकीय संचालकांकडे निवेदन आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह सादर करणे बंधनकारक राहील तसेच निवेदन सादर न केल्यास अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांना राहील व तो ठेकेदाराला बंधनकारक राहील.

**३५)** ठेकेदाराने अयोग्य प्रकारे बर्फाची खरेदी / विक्री अथवा गैरव्यवहार करु नये, असे आढळल्यास त्यास ठेकेदार जबाबदार राहील व प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेवून सदर ठेकेदाराचा ठेका रद्द करण्यात येईल.

मी वरील सर्व नियम व अटी वाचून व समजून घेवून निविदा भरलेली असून मला मान्य आहेत.

निविदाधारकाची स्वाक्षरी

दिनांक : . . ../. . ./२०१८

नांव : ........................................................

पत्ता : ...................................................

.....................................................

.....................................................

दूरध्वनी क्रमांक : ..................................

मोबाईल क्रमांक : ................................

# महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ, मर्यादित.मुंबई

**(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम )**

**मुख्य कार्यालय पत्ता** : ३ रा मजला, एन्.के.एम्.इन्टर नॅशनल हाऊस, बाबुभाई एम्.चिनाय मार्ग,
एल.आय.सी. (योगक्षेम) इमारतीच्या मागे, चर्चगेट, मुंबई -४०० ०२१.
टेलीफॅक्स ०२२-२२०२६०१४,२२०२५०२२. इमेल : mfdc@rediffmail.com


## महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ, कुडाळ, जि. सिंधुदूर्ग येथील ३० टन प्रति दिवस क्षमतेचा बर्फ कारखाना १० टनी शितगृहासह आहे त्या स्थितीत ठेक्याने चालविणेबाबत

## निविदा नमुना "ब "( वाणिज्यिक )

(निविदा नमुना "ब "निविदा धारकाने त्यांच्या लेटरहेडवर टाईप करुन
लिफाफा "ब" मध्ये द्यावी )

| | | |
|---|---|---|
| १) निविदा क्रमांक | : | ममविम/ब.का.कुडाळ/ठेका/२०१८-१९/.............. |
| २) निविदा स्विकारण्याची तारीख वेळ व ठिकाण | : | महामंडळाचे मुख्य कार्यालय,मुंबई येथे दि. १४/१२/२०१८ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील |
| ३) निविदा उघडण्याची तारीख, वेळ व ठिकाण | : | महामंडळाचे मुख्य कार्यालय,मुंबई येथे वरील पत्त्यावर दि.१४/१२/२०१८ रोजी दु ०३.०० वाजता निविदा उघडण्यात येतील. |
| ४) ठेका कालावधी | : | ५ वर्षे ( करारनाम्याच्या तारखेपासून निविदेच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून) |
| ५) बर्फ कारखान्याचे ठिकाण | : | प्लॉट क्र. ४४, एम.आय.डी.सी.,कुडाळ सिंधुदूर्ग |
| ६) बर्फ उत्पादन क्षमता | : | ३० टन प्रति दिवस |
| ७) ३० टनी बर्फ कारखाना चालविणेसाठी | : | रु...................... (अक्षरात......................................... ...........................................................) ठेका रक्कम (प्रति वर्ष ) देण्यास तयार आहे. |

निविदा धारकाची स्वाक्षरी

नांव व पत्ता : ........................................................................
...........................................................................
...........................................................................

दूरध्वनी क्र. : ........................ मोबाईल क्र.............................